# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/१३०३ दिनांक : १०, नोव्हेंबर, २००६

विषय: दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०६ व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०६ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

सोबत : इतिवृत्त

(माधव दोमकोंडवार)
सदस्य सचिव

प्रधान सचिव,
पा.पु. व स्व.विभाग :

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता,
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :

B.M.-106/1

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/बैठक-१०६/२८५/आ-४. दिनांक : २४.११.२००६

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष,मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** मंगळवार दिनांक ३१.१०.२००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०६ व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक ३१.१०.२००६ रोजी झालेल्या १०६ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपला विश्वासू,

२४/११/०६

**( सु.पु. भातखंडे )**
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**सोबत :**१०६व्या सभेचे इतिवृत्त

..२..

**प्रत,**

**वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.**

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ३,५,७ तसेच आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २,४ वर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. २,६,८ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ तसेच UIDSSMT कार्यक्रमांतर्गत कार्यक्रम बाबीवर इतिवृत्ताच्या अंतिम पृष्ठावर नमूद केलेल्यावर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/, म.जी.प्रा., नवी मुंबई.

**आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेली बाब क्र.**४ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ३** वर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४/५/६/७.

कायदा व कामगार अधिकारी , म.जी.प्रा. नवी मुंबई यांच्या माहितीसाठी.

**वरील संबंधीत अधिका-यास विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षासंबंधी असलेल्या संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावेत.**

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०६ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०६ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१, ऑक्टोबर, २००६ दुपारी ३.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३. श्री. जे. एम. फाटक, प्रधान सचिव, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री. माधव दोमकोंडवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
५. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. शि. म. म्हात्रे, (उप सचिव वित्त) वित्त विभाग.
६. श्री. र. ना. अंबरित, उप-सचिव, ग्राम विकास विभाग.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. संजय दहासहस्त्र अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
२. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे .
३. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
४. श्री. व्ही. आर. कल्याणकर, मुख्य अभियंता, तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

दोमकोंडवार

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(५)

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २२ ऑगस्ट, २००६ रोजी झालेल्या १०५ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

मजीप्राच्या १०५ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

या बैठकीतील कार्यक्रम बाब क्र. ४ अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांचे बाबतीत म.जी.प्रा.ने संशोधन व विकास (R & D) कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्यावर लवकर प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक आहे असे मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी सूचीत केले. याबाबत काही संस्थांशी व अभियांत्रिकी विद्यालयांशी सांमजस्य करार करण्यात आले आहेत असे मा. सदस्य सचिव यांनी अवगत करुन दिले.

संशोधन व विकास कार्यक्रमांतर्गत चर्चा करताना नदी काठावरील शहरे सांडपाणी नदीत सोडतात त्यामुळे नदी काठावरील खालील बाजूस असलेल्या गावांना अशुध्द पाणी पुरवठा होतो व अशुध्द पाण्यापासून उद्‌भवणाऱ्या आजारांची लागण होते. यावर मात करण्यासाठी पारंपारिक मोठया जलशुध्दीकरण केंद्रा ऐवजी नवीन पध्दतीच्या Membrane Technology चा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल असे मा. प्रधान सचिव यांनी सूचविले. विशेषत: नदी काठच्या गावांसाठी काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर Membrane Technology चा वापर करुन मजीप्राने Membrane Technology ची उपयोगिता त्यासाठी लागणारा खर्च याचा अभ्यास करावा. तसेच यासाठी NCL या संस्थेशी संपर्क साधावा असे सूचविले.

सदरच्या विषयावर चर्चा करताना नागरी भागासाठी सांडपाण्याचे Recycling करुन पाण्याचा पुनर्वापर करण्याची आवश्यकता आहे असे मा. प्रधान सचिवांनी सूचविले.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

मजीप्राच्या काही योजनांच्या बाबतीत कंत्राटदार योजना पूर्णपणे कार्यान्वित न करता फायद्याची व सोपी कामे करतात. योजना ९०% पुर्ण होते व उर्वरित किरकोळ कामे करीत नाही. त्यामुळे मजीप्रास योजना कार्यान्वित व पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या रोषास सामोरे जावे लागते. त्यासाठी प्रचलित निविदेंमध्ये आवश्यक अटींचा समावेश करुन बदल करणे आवश्यक आहे असे मा. प्रधान सचिव यांनी सूचविले.

याबाबत मा. सदस्य सचिव यांनी औरंगाबाद येथे अशाप्रकारची मॉडेल डि.टी.पी. तयार करण्यात आली होती तीची प्रत सर्व मुख्य अभियंता यांना दिली आहे व त्यात अजून काय सुधारणा करणे गरजेचे आहे याबाबतीत मुख्य अभियंता यांचे प्रस्ताव मागितले आहेत त्यावर मुख्य अभियंता यांचे बैठकीत मॉडेल DTP ला अंतिम स्वरुप देण्यात येईल असे सांगितले.

वरील सर्व मुद्यांबाबत काय कार्यवाही करण्यात आली व येत आहे ते पुढील बैठकीत सविस्तरपणे सादर करावे अशा सूचना मा. प्रधान सचिव यांनी दिल्या.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन मजीप्राच्या १०५ व्या बैठकीत जे निर्णय घेण्यात आले होते त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीत मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केले या अनुषंगाने कार्यक्रम बाबीस जोडलेल्या दिनांक २१.८.२००६ ते २७.१०.२००६ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणुकीसही मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : सन २००३-०४ चा वार्षिक अहवाल :**

प्राधिकरणाचा सन २००३-०४ या वर्षाचा वार्षिक अहवाल, नागपूर येथे होणाऱ्या आगामी विधान मंडळाच्या अधिवेशनात दोन्ही सभागृहापुढे सादर करावयाचा असल्याने सदरची कार्यक्रम बाब संचालक मंडळासमोर सादर करण्यात येत असल्याचे नमूद करुन सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती विषद केली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा. अध्यक्ष यांनी अधिवेशनामध्ये मजीप्राचा वार्षिक अहवाल सादर करण्यास विलंब लागत असल्याचे नमूद केले. याबाबत वार्षिक लेखे महालेखापाल यांचेकडून तपासणी होऊन त्यांनी उपस्थित केलेल्या शेऱ्यांच्या पूर्ततेनंतर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच वार्षिक अहवालास अंतिम स्वरुप द्यावयाचे असल्याने यास विलंब होतो असे वि.स.व मु.ले.अ. यांनी अवगत केले.

चर्चेनंतर सदरच्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन सदरचा अहवाल नागपूर येथील अधिवेशनात सभागृहा समोर सादर करण्यासाठीची आवश्यक ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांनी प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा लागू केल्याने त्याच धर्तीवर मजीप्रातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. याअनुषंगाने शासनाच्या निर्णय क्र. प्रवास-१००५/प्रक्र-१७/सेवा-५, दिनांक १९.६.२००६ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १९.६.२००६ पासून लागू केलेला दैनिक भत्ता मजीप्राच्या कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात येत आले.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बीड येथील सिटी सर्व्हे क्र.७८८७ मधील ८६०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या मालकीच्या जागेच्या संरक्षणासाठी भिंत बांधणेबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बीड येथील सिटी सर्व्हे क्र. ७८८७ मधील ८६०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या मालकीच्या जागेच्या संरक्षणासाठी भिंत बांधण्याच्या कामासाठी येणाऱ्या रु.५,५५,०००/- इतक्या खर्चाच्या व या जागेचा भविष्यात **बांधा, वापरा व हस्तांतर करा** या तत्वावर विकास करण्यासाठीच्या प्रस्तावाबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येऊन याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे सोपविण्याबाबत..**
**कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२०१२**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाचे, दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२०१२ पर्यंतचे काम भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचेकडे Controller & Auditor General (Duties, Powers & Condition of Services) Act-१९७१ मधील कलम-२०(१) नुसार सोपविण्याबाबतची ही कार्यक्रम बाब असल्याचे नमूद करुन याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी व पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-१ व नवी मुंबई महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना वेगवेगळया करणेबाबत..**

न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-१ ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेपासून स्वतंत्र करण्यासाठी करावयाच्या कामासाठी येणाऱ्या रु. १५१.६१ लक्ष निव्वळ किमतीच्या प्रस्तावाच्या या कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावानुसार येणारा खर्च हा नवी मुंबई महापालिकेने उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिनांक १६ मे, २००६ रोजीच्या मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिले होते. तथापि, या खर्चासाठीचा निधी उपलब्ध करुन देण्यास महापालिकेने अद्याप कार्यवाही न केल्याने हा खर्च न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-१ च्या घसारा निधीतून करण्याचे प्रस्तावित असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली व सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब १:** **ढोकी व ४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तालुका व जिल्हा उस्मानाबाद. योजनेचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करणेबाबत.**

ढोकी व ४ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तालुका व जिल्हा उस्मानाबाद, या योजनेच्या रु. १६०९.६८ लक्ष किमतीच्या प्रस्तावास दिनांक ३०.८.१९९८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर योजनेची कामे पूर्ण होऊन या सर्व गावांना मार्च-२००५ पासून पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. सदर योजना जिल्हा परिषदेने ताब्यात घेतली नसल्याने त्याचप्रमाणे पाणी पुरवठा बंद ठेऊ नये अशी मागणी होत असल्याने सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने थेट ग्राहकापर्यन्त राबविण्यासाठी मजीप्रा उस्मानाबाद कडे असलेले अतिरिक्त कर्मचारी वापरुन चालविण्याचे प्रस्तावित असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष, यांनी योजना चालविण्यासाठी आकारण्यात आलेले पाणी पुरवठयासाठीचे रु. ७०/- प्रति जोडणीचे हे दर खूपच कमी असल्याने सदरचे दर रु.१००/- प्रति जोडणी आकारावेत व योजना तोटयात चालवू नये असे निर्देश दिले. सदर योजनेप्रमाणे प्रत्येक जिल्हयात एक वा दोन योजनांची देखभाल व दुरूस्ती मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने मजीप्राने करावी अशी चर्चा होऊन अंतिमतः या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन पूढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब २:** **प्रगतीपथावरील नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग ॲन्ड फायनान्स सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई या वित्तीय संस्थेकडून नव्याने घ्यावयाचे कर्ज.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या अमरावती, पिंपरी-मेघे, कुळगाव-बदलापुर व अंबरनाथ या प्रशासकीय मान्यता प्राप्त पाणी पुरवठा योजनांना हुडको या वित्त संस्थेने कर्ज मंजूर केले आहे. तथापि, हुडकोने सदर कर्जासाठी शासन हमी अथवा स्थिर मालमत्ता गहाण ठेवण्याची घातलेल्या अटीची पूर्तता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करु शकत नाही. त्यामुळे अद्याप हुडकोने मंजूर केलेले कर्ज मजीप्रास प्राप्त होऊ शकलेले नाही. त्यामुळे या योजनांची कामे अद्याप हाती घेता आलेली नाहीत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तसेच प्रगतीपथावरील लातूर पाणी पुरवठा योजना मजीप्राची योजना म्हणून ग्राहकांपर्यंत देखभाल व दुरूस्तीसह चालविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून या योजनेसाठीच्या कर्जाचा प्रस्ताव हुडको या वित्तीय संस्थेस सादर केला आहे. तथापि, अद्याप हे कर्ज मंजूर झालेले नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता शासनाच्या दिनांक २५.८.२००६ च्या पत्र क्र.संकिर्ण-२००६/प्र.क्र.९२/पापु-०४, नुसार नागरी संस्थांना हमी वितरीत अर्थसहाय्य, इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग ॲन्ड फायनान्स सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई या वित्तीय संस्थेकडून घेण्याचे प्रस्तावित असल्याने या संदर्भात दिनांक ५.९.२००६ रोजी मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांचे दालनात सदर संस्थेच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार दिनांक २५.९.२००६ रोजी सदस्य सचिव यांनी बैठक घेऊन उपरोक्त ५ योजनांना या संस्थेकडून कर्ज घेण्याचे प्रस्तावित केले आहे. या अनुषंगाने सदर प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठी सदर बाब सादर केल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

या प्रस्तावावर चर्चा होऊन या योजनांसाठी रु. ५४८९.८४ लक्ष इतके कर्ज अटी व शर्तींनुसार उभारण्यास मान्यता देण्यात येऊन सन २००६-०७ मध्ये कर्ज उभारणीकरिता वार्षिक योजनेत तरतूद करणेसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्याची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब ३: रुपांतरीत आस्थापनेवरील कारकून संवर्गातील कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक पदाचे काम करणेस मान्यता देण्याबाबत.**

प्रथमतः कारकून संवर्गातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक पदाचे काम कार्यव्यवस्था (Working Arrangement) म्हणून करावयास देण्याच्या प्रस्तावास या कार्यक्रम बाबीमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. त्यानंतर देखील कनिष्ठ लिपिकांची कामे ज्या ज्या प्रादेशिक विभागात रिक्त असतील ती व जिल्हा परिषदेकडे रिक्त असलेली कनिष्ठ लिपिकांची पदे ठाणे व पुणे या प्रादेशिक विभागातील अतिरिक्त कनिष्ठ लिपिकामधून कनिष्ठत्तम कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन भरण्यात यावी. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**आयत्यावेळीची कार्यक्रम बाब ४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००३-०४ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास मंजूरी मिळणेबाबत.**

मजीप्राचे सन २००३-०४ या वर्षाचे लेखे दिनांक १९.४.२००५ रोजी झालेल्या १०० व्या बैठकीत स्वीकृत झाले असून महालेखापाल, लेखापरिक्षण, मुंबई यांनी या वार्षिक लेख्याचे परिक्षण करुन त्यांच्या दिनांक ३.५.२००६ च्या पत्रांन्वये सदर लेखे प्रमाणित केले आहेत.

सदर प्रमाणित केलेला लेखा परिक्षण अहवाल अनुपालनासह संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असून मान्यतेनंतर लेखे व लेखा परिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यात येईल असे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

चर्चे अंती कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येवून सदर अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर होण्याकरिता शासनास पाठविण्यासाठीही मंजूरी प्रदान करण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळेचा विषय : UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूर होणाऱ्या व झालेल्या पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांची कामे मजीप्रास मिळणेबाबत..**

मुख्य अभियंता, पुणे यांनी मा.संचालक मंडळाला माहिती दिली की केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरासाठी UIDSSMT योजनांच्या महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प अहवालांची तपासणी करुन देण्याचे काम महापालिका संचालनालयाच्या वतीने सल्लागार तत्वावर पुणे विभागाने केले. यात एकूण रु. १७५४.७३ कोटी खर्चाच्या ३० प्रकल्पांची तपासणी करुन देण्यात आली व सदरच्या योजना केंद्र शासनाच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या State Level Selection Committee दिनाक २८/९/२००६ च्या बैठकी पुढे ठेवण्यात आल्या. या बैठकीत केंद्र शासनाकडे उपलब्ध निधीच्या प्रमाणात रु. २७२.५५ कोटीच्या १५ योजना मंजूर करण्यात आल्या व त्यास सन २००६-०७ साठी रु. २१८.०४ कोटी केंद्र शासनाचे अनुदान मंजूर करण्यात आले. सदर योजनेतील ८०% केंद्र शासनाचे अनुदान, १०% राज्य शासनाचे अनुदान व १०% संबंधीत नगरपालिकेचा हिस्सा अशा प्रकारचे वित्तीय आकृतीबंध आहे. याच योजना राज्य शासनातर्फे घेण्यात आल्या असत्या तर,

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

महानगरपालिकांना २३.३३%, 'अ' वर्ग नगरपालिकांना २५%, 'ब' वर्ग नगरपालिकांना ४०%, 'क' वर्ग (२०,००० लोकसंख्येच्या पुढील) नगरपाकिंना ४०%, तर 'ड' वर्ग (२०,००० पेक्षा कमी लोकसंख्या) नगरपालिकांना ९०% अनुदान राज्य शासनाला द्यावे लागले असते. तथापी आता केवळ १०% च अनुदान राज्य शासनाने द्यावयाचे असल्याने या योजनेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अंमलबजावणी करुन घेताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ETP Charges राज्य शासनाने देणे हे राज्य शासन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या दोघांचे हिताचे राहिल. यात नगरपालिकांना देखील अतिरिक्त बोजा येणार नाही, मात्र त्याचवेळी तांत्रिक दृष्टीने सक्षम यंत्रणेकडून चागल्या प्रकारे काम करुन घेता येईल. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी देखील ही बाब अजून स्पष्ट करुन राज्य शासनाने १०% अनुदान व्यतिरिक्त मजीप्राचे ETP Charges देणे हे नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व राज्य शासन या तिघांचे दृष्टीने Win-win position चे राहिल असे सांगितले. मात्र त्याचवेळी सदरचा पैसा देताना योजना वेळेवर व उत्तम दर्जाच्या होणे आवश्यक आहे. E&P शुल्कापोटी केंद्र शासनाकडून मिळणारे व मजीप्रास देय असलेले १७.५% शुल्क यामधील फरकाची रक्कम, सदरच्या योजना गुणवत्ता पूर्वक पूर्ण झाल्यावर राज्य शासनाने देणे योग्य राहील असे मत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी मांडले. त्यावर सदस्य सचिव यांनी या योजना मजीप्रा गुणवत्ता पूर्वक करेल याची ग्वाही दिली. सदर चर्चा सुरू असताना मजीप्राने यापूर्वी अंमलबजावणी केलेल्या बीड, लातूर सावळज, जेजूरी, सासवड, शिरभावी पाणी पुरवठा योजना जलद गतीने व गुणवत्तापूर्वक पूर्ण केल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले व अपवाद वगळता मजीप्राचे काम गुणवत्तापूर्वक असल्याच आग्रहाने प्रतिपादीले. त्यास प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. तसेच प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी दूजोरा दिला. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी असे सागितले की, संपूर्ण पैसा प्रकल्प पूर्ण झाल्यावर दिल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दैनंदिन खर्चाच्या दृष्टीने योग्य राहणार नाही. मात्र त्यातील काही टक्के रक्कम प्रकल्प वेळेत पूर्ण करणे व चांगला दर्जा राखणे यासाठी incentive म्हणून ठेवावयास हवी. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (तथा प्राधिकरणाचे सदस्य) यांना निर्देश दिले की, केंद्र शासनाकडून मिळू शकणारे शुल्क व मजीप्रास १७.५% प्रमाणे देय असणारे शुल्कातील फरक राज्य शासनाने सोसावा असा प्रस्ताव शासनाने मंजूर करण्यासाठीची टिप्पणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर करावी.

चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.

Board 100 Minutes/106 Minutes/84

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.